**आकाशवाणी नागपूर,**
**(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**शुक्रवार दिनांक ०४ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **त्रिनिदाद इथले भारतीय वंशाचे नागरिक आता ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया कार्डसाठी पात्र ठरतील, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा.**
2. **राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस पदभरती प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे सरकारचे आदेश.**
3. **राज्यातल्या मालमत्ता खरेदी विक्रीच्या नोंदणीनंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या हिश्शाचा एक टक्का रक्कम त्वरित देण्यासाठी वेगळी यंत्रणा तयार केली जाईल - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे.**

**आणि**

4. **येत्या ८ तारखे पर्यंत विदर्भात दररोज पावसाची शक्यता, परवा नागपूर भंडारा गोंदिया मध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट.**

-----------

पंतप्रधान नरेंद्र मोदी

भारत हा जगभरातला तिसऱ्या क्रमांकाचा स्टार्टअप हब असल्याचं गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पोर्ट ऑफ स्पेन इथं काढले. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधील भारतीय समुदायाला संबोधित करताना ते बोलत होते. तत्पूर्वी विमानतळावर त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधल्या भारतीय समुदायाचा प्रवास धैर्याचा असून आपले पूर्वज भारतीय संस्कृतीचे वाहक आहेत असंही ते म्हणाले. त्रिनिदाद इथले भारतीय वंशाचे नागरिक आता ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया कार्ड साठी पात्र ठरतील अशी घोषणाही त्यांनी केली......

***I am happy to announce that OCI cards will now be given to the 6th generation of the Indian diaspora in Trinidad and Tobago. You are not just connected by blood or surname, you***

***are connected by belonging, India looks out you, India welcomes you and India embraces you.***

या कार्डामुळे भारतीय वंशाच्या नागरिकांना भारतात राहण्यास आणि काम करण्यास कोणतीही अडचण येणार नाही, असं पंतप्रधानानी  सांगितलं. कॅरेबियन द्विपसमूहात सर्वप्रथम आर्थिक व्यवहारात यूपीआय प्रणालीचा वापर केल्याबद्दल मोदी यांनी त्रिनिनाद आणि टोबॅगोचं कौतुक केलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू
खेळामुळे शिस्त, दृढनिश्चय आणि सांघिक भावना वाढते. खेळामध्ये लोक, विविध प्रदेश आणि देशांना जोडण्याची अद्वितीय शक्ती असते असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं ड्युरँड चषक २०२५ या फुटबॉल स्पर्धेच्या चषकांचं अनावरण झालं,त्यावेळी राष्ट्रपतींनी उपस्थितांना संबोधितही केलं. भारतात खेळ हे कायमच राष्ट्रीय एकात्मतेचं एक सामर्थ्यशाली माध्यम राहिलं असल्याचं त्या म्हणाल्या.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या त्रिशक्ती प्रवेशद्वारावर थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण केलं. थोरले बाजीराव पेशवे यांच्या स्मारकाची योग्य जागा ही राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच आहे. याच ठिकाणी तिन्ही सैन्यदलांचे अधिकारी भविष्याचं प्रशिक्षण घेतात, ते बाजीराव यांच्याकडून प्रेरणा घेतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

***युद्ध में देशभक्ति का भाव युद्ध में बलिदान का भाव वही सेनाओं को विजय दिलाता है, हथियार बदलते रहते हैं और अगर ये सभी गुणों का सबसे उत्कृष्ट उदाहरण पाँच सौ साल के भारतीय इतिहास में कहीं पर ढूंढना है।तो मैं इतिहास के विद्यार्थीय नाते बेझिझक कह सकता हूँ वो केवल श्रीमंत बाजीराव पेशवे मे ही मिल सकता है।)***

अमित शहा यांच्या हस्ते या पुतळ्याचे शिल्पकार विपुल खटावकर आणि स्थापत्यकार अभिषेक भोईर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ, लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंन्ट जनरल धीरज सेठ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या दौऱ्यात, अमित शहा, कोंढवा परिसरात जयराज क्रीडा संकुलाचं उद्घाटन आणि बाळासाहेब देवरस रुग्णालयाची पाहणी करणार आहेत.

बोगस पदभरती-विधान परिषद

राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा बोगस पदभरती प्रकरणी, संबंधित विभाग आणि शिक्षणसंस्थांच्या अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करायचे आदेश दिले असल्याची माहिती शालेय शिक्षण राज्य मंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहाला दिली. आमदार सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. या प्रकरणी एका महिन्याच्या आत राज्यस्तरीय चौकशी समिती स्थापन केली जाणार असल्याचंही भोयर यांनी सभागृहाला सांगितलं. राज्य सरकारच्या १५ मार्च २०२४च्या शासन निर्णयानुसार ठरवलेल्या,शाळांच्या संच मान्यतेच्या निकषात सुधारणा केली जाणार आहे, तसंच शालार्थ ओळखपत्र तातडीनं देण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे, असंही त्यांनी एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. शासन निर्णयासंबंधी विरोधी पक्षाच्या सूचना विचारात घेण्याकरता एका बैठकीचं आयोजन करणार असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली. आमदार अभिजीत वंजारी यांनी याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला होता.

चंद्रशेखर बावनकुळे-विधान सभा

राज्यातल्या मालमत्ता खरेदी विक्रीच्या नोंदणीनंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या हिश्शाचा एक टक्का रक्कम त्वरित देण्यासाठी वेगळी यंत्रणा तयार केली जाईल अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरात दिली. या विषयावर अर्थमंत्री आणि मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. रणधीर सावरकर यांनी ही लक्षवेधी मांडली होती.

***जशी नोंद झाली. मुद्रांक झाला तशीच ती तात्काळ त्या त्या संस्थेला मिळाली पाहिजे या करता मी एक बैठक माननीय मुख्यमंत्र्यांकडे घेऊन आणि जी रक्कम या ठिकाणी पेंडिंग आहे, तर डिसेंबरच्या बजेटमध्ये ही त्या ठिकाणी आणण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांकडे मी प्रयत्न करेल. पण यापेक्षा चांगल मेकॅनिझम काय करता येईल हाही विचार आपण करू.***

दरम्यान, सध्या राज्यातल्या नगरपालिकांचे ९३० कोटी, महानगरपालिकांचे ४ हजार ३२९ कोटी तर जिल्हा परिषदांचे २ हजार ५९८ कोटी इतकी रक्कम देणं बाकी असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.

हवामान

येत्या आठ तारखेपर्यंत विदर्भात दररोज पावसाची शक्यता असून आज देखील अमरावती, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळाची शक्यता नागपूरच्या हवामान विभागाने वर्तवली आहे. याशिवाय सहा जुलै रोजी नागपूर, भंडारा आणि गोंदिया या तिन्ही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, येत्या काही तासात नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, अमरावती, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता असून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस देखील पडू शकतो, असा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे

राष्ट्रीय परिषद

'भारतीय संसदेद्वारे संवैधानिक लोकशाही आणि राष्ट्र उभारणी मजबूत करण्यात शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका' याविषयावर हरीयाणातील मानेसर येथे आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये नागपूरचे माजी महापौर दयाशंकर तिवारी, नंदा जिचकार, माजी उपमहापौर संदीप जाधव आणि दीपराज पार्डीकर सहभागी झाले होते. या राष्ट्रीय परिषदेला लोकसभेचे अध्यक्ष ओम बिरला यांनी प्रामुख्याने मार्गदर्शन केले.

शालेय विद्यार्थी दिंडी

आषाढी एकादशी निमित्त नागपुरात उद्या पंढरी अवतरणार असून यात सुमारे दीड हजार शालेय विद्यार्थी सहभागी होणार आहेत. महाराष्ट्राच्या वारकरी

संप्रदायातील संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांचे महान कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, त्यांच्या परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीव नव्या पिढीत रुजावी, यासाठी शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद नागपूर, नूतन भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर तसेच मराठी ज्ञानसंवर्धन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या शालेय वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवारी सकाळी ९ वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, शंकरनगर येथून दिंडीला प्रारंभ होईल. यात विविध शाळांमधील 1500 हून अधिक विद्यार्थी पारंपरिक वारकरी वेशभूषेत सहभागी होणार असून संत प्रतिमा व ग्रंथांचा त्यात समावेश राहणार आहे. या दिंडीचा ज्ञानेश्वर मंदिर, बजाजनगर येथे समारोप होईल.

*****